MHLA140007872026

**दि.कि.अर्ज क्र. २६८/२०२६**

भास्कर वि. निरंक.

**नि.क्र.१ वर आदेश**

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन कायदा कलम २ नुसार वारसा प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळणेसाठी दाखल केला.

२. अर्जातील कथन असे आहे की, अर्जदार व परिच्छेद क्र. ४ मध्ये नमूद व्यक्ती हे मयत क्र.१ **राम महादा घायाळ व** क्र. २ **शारदा राम घायाळ** यांचे वारस आहेत. मयत क्र.१ **राम महादा घायाळ** व मयत क्र. २ **शारदा राम घायाळ** हे अनुक्रमे दिनांक ०४.०६.२००५ व २९.०९.२०२४ रोजी मौजे तळणी, ता. औसा, जि. लातूर येथे मयत झाले. मयत **राम महादा घायाळ व शारदा राम घायाळ** यांचे अर्जदार व परिच्छेद क्र. ४ मध्ये नमूद व्यक्ती हे वारस असल्याबाबत अर्जदारांना वारस प्रमाणपत्राची (Heirship Certificate) आवश्यकता आहे सबब त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. सदरचा अर्ज दाखल केल्यानंतर अर्जदार व परिच्छेद क्र. ४ मध्ये नमूद व्यक्ती हे मयताचे वारस आहेत किंवा नाहीत व त्यांच्या व्यतिरिक्त इतर कोणी वारस आहे किंवा नाही याची पडताळणी करण्यासाठी ०३.०४.२०२६ रोजी **'दैनिक मनोगत'** या वर्तमानपत्रातून जाहीरनामा प्रसिध्द करण्यात आला होता. त्या अनुषंगाने संबंधितांना हरकती उपस्थित करण्याबाबत निमंत्रीत केले होते. सदर वर्तमानपत्राची प्रत निशाणी क्र.१० वर आहे. तसेच सदर जाहीरनाम्याची प्रत अन्य ठिकाणी प्रसिध्दी देवुन त्या बाबतचा अहवाल दाखल करुन घेतला. परंतू कोणीही मयताचे वारस असलेबाबत आजपावेतो हरकत उपस्थित केलेली नाही.

४. अर्जदार व परिच्छेद क्र. ४ मध्ये नमूद व्यक्ती यांनी अर्जात नमुद केल्याप्रमाणे ते मयताचे वारस आहेत हे दाखविण्यासाठी अर्जदार यांनी त्यांचे पुराव्याचे

शपथपत्र निशाणी क्र.११ वर दाखल केले आहे. **राम महादा घायाळ व शारदा राम घायाळ** हे मयत झाले हे दाखविण्यासाठी मयताचे मृत्यू प्रमाणपत्र नि.क्र.७ व नि.क्र.८ दाखल केले आहे. अर्जदाराच्या पुराव्यावरुन व त्यांनी दाखल केलेल्या मृत्यूच्या प्रमाणपत्रावरुन **राम महादा घायाळ व शारदा राम घायाळ** हे मयत झाल्याचे दिसून येते. अर्जदार यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये ते व परिच्छेद क्र. ४ मध्ये नमूद व्यक्ती हे वारस असल्याचे नमूद केले आहे. तसेच त्यांच्या शिवाय मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नसल्याचे नमूद केले आहे. अर्जदारांना सदरचे वारसा प्रमाणपत्र हे शासकीय व निमशासकीय योजनेचा लाभ घेण्याकरीता आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.

५. अर्जदार व परिच्छेद क्र. ४ मध्ये नमूद व्यक्ती हे **राम महादा घायाळ व शारदा राम घायाळ** यांचे वारस असल्याबाबत किंवा इतर कोणी वारस असल्याबाबत जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासून आजपर्यत कोणीही आक्षेप घेतलेला नाही. तसेच बेलिफ अहवाल निशाणी क्र.१३ वर दाखल केले आहे. यावरुन अर्जदार व परिच्छेद क्र. ४ मध्ये नमूद व्यक्ती हे मयत **राम महादा घायाळ व शारदा राम घायाळ** यांचे वारस असल्याचे दिसून येते. त्या अनुषंगाने अर्जदार यांना वारसा प्रमाणपत्र (Heirship Certificate) देण्यास कोणतीही कायदेशीर अडचण नाही. सबब खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## :: आदेश ::

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार व परिच्छेद क्र. ४ मध्ये नमूद व्यक्ती क्र. १ व २ हे मयत **राम महादा घायाळ व शारदा राम घायाळ** यांचे वारस या नात्याने वारसा प्रमाणपत्र (Heirship Certificate) देण्यात येत आहे.

३. अर्जदार यांनी आवश्यक कोर्ट फीची पूर्तता करुन घ्यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SABALE SHITAL DATTATRAY
Date: 2026.07.27 17:54:53 +0530

**औसा.** **(श्रीमती एस. डी. साबळे)**

**दिनांकः– २७.०७.२०२६** **२रे सह दिवाणी न्यायाधिश, क. स्तर., औसा.**